## नवी मुंबई महानगरपालिका

**महानगरपालिका सचिव कार्यालय, ८ वा मजला, बेलापूर भवन सी.बी.डी. बेलापूर, नवी मुंबई ४०० ६१४.**

**-: सर्वसाधारण सभेची नोटीस :-** **दिनांक २०/०२/२०१४.**

-: शुध्दीपत्रक :-

नवी मुंबई महानगरपालिकेची **फेब्रुवारी महिन्याची दुसरी सर्वसाधारण सभा, शुक्रवार, दिनांक २८ फेब्रुवारी २०१४ रोजी सकाळी ११.०० वाजता** बेलापूर, भुखंड क्रमांक ०१, सेक्टर १५ए, नवी मुंबई महानगरपालिका, **नवीन मुख्यालय** येथील, ५ व्या मजल्यावरील **राजमाता जिजाऊ सभागृह** येथे खालील विषयांवर विचार करण्यासाठी भरेल :-

१. इतिवृत्त कायम करणे.

२. प्रश्नोत्तरे.

**आयुक्तांकडील प्रस्ताव :**

३. सानपाडा, सेक्टर क्र. २४, भूखंड क्र. ५ व ६ या भूखंडाचा "विद्यमान कत्तलखाना व पशुवैद्यकिय दवाखाना (Slaughter House & Veterinary Dispensary)" हया वापराऐवजी "पशुवैद्यकिय रुग्णालय (Veterinary Hospital)" असा वापर बदल करणेबाबत.

४. ऐरोली येथील साईनिधी हॉटेल ते अभिनंदन हॉटेलपर्यंत गटर व फूटपाथ बांधणे.

५. कोपरखैरणे, प्र.क्र. २२ महापेगांव येथील गांवदेवी मंदीर ते अंगणवाडी पर्यंत व गणपत घरत यांचे घरापासुन यशवंत पाटील यांचे बिल्डींग पर्यंतच्या गटाराची व पदपथाची सुधारणा करणे.

६. कोपरखैरणे येथील भुखंड क्र. १ से.-२ए येथील प्रस्तावित अग्निशमन केंद्राचे बांधकाम करणे.

७. ऐरोली सेक्टर ५ भुखंड क्र. २३ डी येथे दैनंदिन बाजार बांधणे.

८. कोपरखैरणे सेक्टर - २३ येथील भुमिपुत्र मैदान विकसित करणे.

९. सार्वजनिक रुग्णालय, वाशी येथील ३०० रुग्णखाटा तेरणा वैद्यकिय महाविद्यालय, नेरुळ यांना M.B.B.S. विद्यार्थांच्या शैक्षणिक प्रयोजनार्थ देणेबाबत.

**ठरावाच्या सूचना :**

**१० ते १२. सौ. कोमल सोमनाथ वास्कर, यांजकडून :-**

(१०) सानपाडा आर.टी.ओ. सर्कल ते जुईनगर रेल्वे स्टेशन मार्गे शिरवणे जाणा-या रस्त्याची अत्यंत दयनीय अवस्था झालेली आहे. तसेच सानपाडा-तुर्भे एम.आय.डी.सी. मध्ये उदरनिर्वाहासाठी कार्यरत असलेला कामगार वर्ग हयाच रस्त्यावरुन जुईनगर रेल्वे स्टेशन पर्यंत पायपीट करत असतो. तरी सदर रस्त्याची डांबरीकरणाने दुरुस्ती करुन रस्त्याच्या एका बाजुस इंटरलॉक टाकून पदपथ तयार करणे.

(११) नमुंमपाच्या वतीने सिडको कंडोनियम अंतर्गत मलनि:स्सारण वाहिनी, पाण्याची नवीन पाईप लाईन तसेच आवारातील मोकळया जागेतील पदपथांची दुरुस्ती करण्यात येते त्याच धर्तीवर नवी मुंबईतील गावठाण विस्तार योजनेतील सर्व वसाहतीमधील रहिवाशीयांनाही या योजनेचा लाभ देण्यात यावा तसेच सन्मा. नगरसेवकांना आपला प्रभाग निधी, नगरसेवक निधी गावठाण विस्तार योजनेतील सर्व वसाहतीमधील इमारतीत वापर करण्याचे धोरण ठरविणे. (१२) नमुंमपाच्या वतीने सिडको कंडोनियम अंतर्गत मलनि:स्सारण वाहिनी, पाण्याची नवीन पाईप लाईन तसेच आवारातील मोकळया जागेतील पदपथांची दुरुस्ती करण्यात येते परंतु बहुतांशी कंडोनियममध्ये उद्यान ही आहेत तरी सिडको कंडोनियम अंतर्गत असलेल्या उद्यानांच्या संर्वधनासाठी काही निधी वर्ग करण्यात यावा तसेच अशा सर्व उद्यानांची दुरुस्ती नवी मुंबई महानगरपालिकेने करावी.

**१३ ते १५. श्री. चंद्रकांत रामदास पाटील, यांजकडून :-**

(१३) प्र. क्र. २२, महापे अंतर्गत अडवली-भुतवली व महापेगांव येथे भुमिगत व उच्च स्तरीय जलकुंभ बांधणे. (१४) प्र. क्र. २२, महापे अंतर्गत अडवली-भुतवली व महापेगांव अंतर्गत मोडकळीस आलेल्या गटारांची पुर्नबांधणी व नवीन गटारे बांधणे. (१५) प्र. क्र. २२, महापे अंतर्गत अडवली-भुतवली व संभाजीनगर येथे समाजमंदिर बांधणे.

**१६. श्री. विक्रम धनाजी शिंदे, यांजकडून :-**

नमुंमपा कार्यक्षेत्रामध्ये सर्व धर्मांची धर्मस्थळे आहेत. उदा. मंदिर, जैनमंदिर, मस्जिद, गुरुद्वारा, बौध्दविहार, चर्च, या धर्मस्थळांच्या सभोवतालच्या ५० मी. आतील परिसरातील सर्व पान बिडी स्टॉल, दुकानांवर कारवाई करण्यात यावी. ज्या स्टॉल दुकानांना महापालिकेच्या नियमानुसार परवाने दिलेले आहेत त्यांना पर्यायी दुसरीकडे जागा देणे.

१७. मनपाचा सन २०१३-२०१४ चा सुधारीत आणि सन २०१४-२०१५ चा अर्थसंकल्प "अ" आणि "क."

१८. परिवहन उपक्रमाचा सन २०१३-२०१४ चा सुधारीत आणि सन २०१४-२०१५ चा अर्थसंकल्प "ब."

१९. शिक्षण मंडळाचा सन २०१३-२०१४ चा सुधारीत आणि सन २०१४-२०१५ चा अर्थसंकल्प.

२०. वृक्षप्राधिकरणाचा सन २०१३-२०१४ चा सुधारीत आणि सन २०१४-२०१५ चा अर्थसंकल्प.

**मा. महापौरांच्या आदेशावरुन,**

**सही/-**
**(चित्रा बाविस्कर )**
**महानगरपालिका सचिव (प्र.),**
**नवी मुंबई महानगरपालिका.**

**महापालिका सचिव कार्यालय,**
**नवी मुंबई महानगरपालिका,**
**दिनांक २० फेब्रुवारी २०१४.**